**<u>संवादकीय:</u> जय हो 'बिझनेस ऍक्टिव्हिजम'** (919)

काही महिन्यांपूर्वी व्हॉट्सअॅप वर एक गोष्ट भरपूर पॉप्युलर झाली होती.ऑलमोस्ट प्रत्येक ग्रुपमधून भरपूर फॉरवर्ड होत होती. तुमच्याही वाचनात ती नक्कीच आलेली असणार. बहुतांश लोकांना ती गोष्ट आवडलेली असणार कारण बऱ्याच व्हॉट्सअॅप ग्रुप मध्ये आणि लोकांच्या प्रत्यक्ष बोलण्यामध्ये त्याच गोष्टीची चर्चा होती. गोष्ट अशी होती की, एका म्युझियमला आग लागलेली असते. म्युझियम मध्ये मौल्यवान चित्र, पेंटिंग्स, आणि पुरातन आर्टिक्युलेटस होती. त्यांना आग लागल्यावर एक छोटीशी चिमणी तिच्या चोचीतून पाणी घेत होती आणि ते ती त्या आगी वर टाकत होती. आग विझवण्याच्या या प्रयत्नांमध्ये ती बिचारी चिमणी आगीच्या धगीमुळे आणि कष्टांमुळे अर्धमेली झाली होती. अर्धमेल्या झालेल्या त्या चिमणीला एकाने विचारलं की तू एवढे कष्ट कशासाठी घेत आहेस? ही एवढी मोठी आग तर काही तुझ्या प्रयत्नांनी विझणार नाही आहे. त्यावेळेला चिमणी म्हणाली की 'ज्या वेळेला या म्युझियमला लागलेल्या आगीचा इतिहास लिहीला जाईल त्यावेळी माझं नाव आग लागण्याच्या कारणां मध्ये नव्हे तर आग वीझवणाऱ्यांच्या यादीमध्ये असेल.' खरंतर गोष्ट त्या चिमणी एवढीच छोटीशी आहे. पण ही छोटीशी गोष्ट, पॉझीटीव्ह ॲक्टिविटीज बद्दल, सकारात्मक अँक्शन्स बद्दल फार मोठं आणि महत्वाचं सांगून जाते की 'आपण सतत पॉझीटीव्ह अँक्शन्स करत राहिल पाहिजे!'

पॉजिटीव्ह अँक्शनसवरुन मला एक प्रसंग आठवतोय. आमचा एक हुशार, अनुभवी मित्र आहे अमोल! एकदा मी अमोलला आवर्जून एका ज्वेलर कडे घेऊन गेलो. तिथे बोलता बोलता इन्व्हेंटरी मॅनेजमेंट आणि इन्व्हेंटरी कॅरिंग कॉस्ट वर विषय निघाला. तेव्हा अमोल न राहून म्हणाला की 'जर आपल्याला इन्व्हेंटरी कंट्रोल मध्ये ठेवायची असेल तर प्रोसेसेस आणि इतर संलग्न गोष्टी तर हव्यातच, पण त्यांच्या जोडीला बरेचदा 'बिझनेस ऍक्टिव्हिझम' पण हवा. 'बिझनेस ऍक्टिव्हिझम? म्हणजे काय?' आम्ही दोघे झटकन म्हणालो. त्यावर तो तितकाच पटकन उत्तरला की 'हा काही नॉर्मल कार्पोरेट ऍक्टिव्हिझम नाही की जो सोशल किंवा एन्व्हायरमेंटल असतो. तो टिपिकल कार्पोरेट ऍक्टिव्हिझम पेक्षा वेगळा असतो. 'बिझनेस ऍक्टिव्हिझम' म्हणजे पॉजिटीव्ह अँक्शन्स करणं. उदा. एखादी इन्व्हेंटरी तुमच्याकडे बरेच दिवस राहिली आहे असं तुम्ही म्हणता ना? तर चला आपण आत्ताच्या आत्ता नेकलेसच्या काउंटर वर जाऊ आणि बारकोड वरुन ज्या नेकलेसेसना 360 दिवसांपेक्षा जास्त दिवस झाले आहेत ते ओळखू. आणि त्यांच्यावर क्विक ॲक्शन घेऊ. जसे की ते वेगळ्या डिस्प्ले वर लावू. ते ॲडव्हर्टाइज़ मध्ये घेऊ. सेल्स पर्सन ना त्यावर एक्स्ट्रा इन्सेंटिव्ह देऊ. मोबाईल ऍप वर, वेबसाईट वर ते आयटम दाखवायला सुरुवात करु. हा झाला 'बिझनेस ऍक्टिव्हिझम!'' पुढे तो हसत हसत ज्वेलरला म्हणाला 'अशाच बिझनेस ऍक्टिव्हिजम मधून बिझनेस ग्रोथच्या नवनवीन प्रोसेसेस सुरु होत असतात' सरते शेवटी निघताना सॉक्रेटीस क्वेश्चनिंग प्रमाणे अमोल ज्वेलरला म्हणाला की 'ह्यातून एखादी चांगली बिझनेस प्रोसेस तुम्ही नक्की चालू करा. मी अवश्य पहायला येईन!'

ह्या प्रसंगानंतर मी केंब्रिज डिक्शनरी मध्ये 'ऍक्टिव्हिझम' शब्दा चा मिनिंग बघितला.  त्याचा पहिला अर्थ दिलेला आहे 'The use of direct and noticeable action to activate a result (usually a practicle or social work).' अर्थात ऍक्टिव्हिझम म्हणजे पॉझिटिव्ह ॲक्शन करणं. की जी नोटीसेबल असेल, डायरेक्ट असेल आणि काहीतरी क्विक रिझल्ट अचीव्ह करण्याचे ठरवून ती ऍक्शन केलेली असेल. तर बीझनेसेस मध्ये सुद्धा आपण अशा बऱ्याच पॉझिटिव्ह अँक्शन्स घेऊ शकतो की ज्यामध्ये रुटीन प्रोसेसला बाजूला ठेवून, पटकन एखादा रिझल्ट मिळण्यासाठी, एखादी ऍक्टिव्हिटी केली जाऊ शकते. अच्छा हे 'ऍक्टिव्हिझम' तयार तरी कशा मधून होतं? 'ऍक्टिव्हिझम' एखाद्या गोष्टी ला विरोध करण्यातून, एखाद्या गोष्टीची चीड असणं जसे आमचा मित्र अमोलला त्या एक्सेस इन्व्हेंटरीची चीड होती, राग येणं, सहानभुती असणं, एम्पथी असणं अशा भावनांमधून पॉजिटीव्ह बदल करणं, यामधून 'ऍक्टिव्हिझम' चालू होतं. आणि जसं अमोल म्हणाला तसं अशा 'ऍक्टिव्हिझम' मधून एखादा बदल घडवून आपण ग्रोथसाठी त्याचे प्रोसेस मध्ये रुपांतर करु शकतो.

इथे दैनंदिन जगण्याच्या संबंधातील एक सोपे उदाहरण मी सांगेन. माझे सासरे ज्या बंगल्यामध्ये राहतात त्या बंगल्याच्या कडेला एक रस्ता आणि 8-10 घर आहेत. एक दिवस सकाळी सहज म्हणून खिडकीतून बघत

असताना एक छोटीशी गोष्ट माझ्या लक्षात आली. काय झालं होतं की सासरेबुवा त्या रस्त्यावर उभे असताना त्यांनी पाहिलं की रस्त्याच्या दोन्ही बाजूला भरपूर प्लास्टिकचे कागद पडलेले असतात. आणि त्यांना त्याचा राग आला. त्यांनी काय केलं की ते सगळे प्लास्टिकचे कागद ताबडतोब गोळा केले आणि कचऱ्याची गाडी आल्यावर त्यात ते टाकले. आता हे 'ऍक्टिव्हिझम' म्हणजे त्या दिवसा पुरतीची ती ऍक्शन किंवा ऍक्टिव्हिटी, त्यांना आलेल्या रागातून घडली होती. पण पुढे जाऊन आता दररोज सकाळी ते कचऱ्याच्या गाडीचा आवाज यायला लागला की बाहेर जातात. बाहेर जाऊन त्यांच्याकडच्या लांब चिमट्याने आठ ही बंगल्यांच्या समोरचे, रस्त्याच्या कडेचे सगळे प्लास्टिकचे कागद त्यांच्या कडच्या मोठ्या बादलीमध्ये गोळा करतात, आणि कचऱ्याच्या गाडीत टाकतात. म्हणजेच काय तर त्या एक वेळच्या 'ऍक्टिव्हिझम' मधून त्यांनी आता त्यांच्यासाठी दररोज सकाळची एक पाच मिनिटांची प्रोसेस तयार केली आहे.याच प्रमाणे बिझनेस साठी सुद्धा 'ऍक्टिव्हिझम' मधून आपण बऱ्याचशा प्रोसेसेस चालू करु शकतो. आणि म्हणूनच 'बिझनेस ऍक्टिव्हिझम' कडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून आपण साऱ्यांनी बघण्याची गरज आहे.

पुढे उत्सुकते पोटी ठरवूनच मी पुन्हा एकदा काही दिवसांनी त्या ज्वेलर कडे गेलो आणि त्यांना 'बिझनेस ऍक्टिव्हिजम' बाबत विचारलं. तर पटकन त्यांनी मला त्यांच्या केबिनमध्ये बोलावलं. त्यांनी दाखवलं की तिथे प्रत्येक दिवसाच्या तारखे समोर एका आयटमचं नाव लिहीलेलं होतं. जसं की १ तारखेला नेकलेस, २ तारखेला अंगठी, ३ तारखेला बँगल वैगेरे वैगेरे. पुढे त्यांनी मला सांगितलं की 'दररोज सकाळी मी दुकानात आल्या नंतर त्या तारखेचा जो आयटम असेल त्याच्या सुपरवायझरला बोलावतो. तो सुपरवायझर त्या तारखेच्या आयटम मधील 180 पेक्षा जास्त दिवस राहिलेले आयटम घेऊन माझ्याकडे येतो. अशा आयटम बाबत मी माझ्याकडे त्यावर घ्यायच्या १४ ऍक्शन्स लिहून ठेवलेल्या आहेत. मग मी प्रत्येक आयटम बघून १४ ऍक्शन्स पैकी पर्टिक्युलरली त्या आयटम वर घ्यायची एखादी ॲक्शन त्याला सजेस्ट करतो आणि तो सुपरवायझर ती ॲक्शन घेतो. आणि त्यामुळे, आपण तर 360 दिवसांच्या पुढच्या इन्व्हेंटरी बाबत बोलत होतो, पण आता मी 180 दिवसाच्या पुढच्या आयटम वरती दररोज काही ना काही ॲक्शन घेत असतो ज्यामुळे माझ्या इन्व्हेंटरी कॅरिंग कॉस्ट मध्ये खूप फरक पडलेला आहे.' पुढे मिश्किल हास्य करत ते मला म्हणाले की 'बिझनेस ग्रोथ साठी आता मी आणखीन एक 'बिझनेस ऍक्टिव्हिजम' करायचं ठरवलं आहे. ते म्हणजे तुमचा तो मित्र आहे ना? अमोल; त्याच्याबरोबर महिन्यातून एकदा तरी जेवायला जायचं.  तुम्ही पण येत चला या आमच्याबरोबर जेवायला'. जय हो 'बिझनेस ऍक्टिव्हिजम'!